## प्रकरण तिसरे

## संशोधनपर संदर्भाचा अभ्यास

मराठी या विषयामध्ये सन १९८१ पर्यन्त पी.एच.डी. पदवीसाठी एकूण २५ संशोधन प्रबंध शिवाजी विद्यापीठामध्ये दाखल झालेले आढळून आले. त्यामध्ये सर्वसाधारण साहित्यिकांच्या वाङ्.मयाचा विवेचक अभ्यास, विशिष्ट कालखंडातील वाङ्.मय व साहित्य यांचा विवेचक अभ्यास या स्वरूपाचे अकरा प्रबंध आढळून आले. ` एकनाथी भागवत ` या प्रबंधामध्ये अभ्यासकाने एकनाथांचे वर्णन चातुर्य, अलंकार, छंदरचना यांचे अभ्यासपूर्ण विवेचन केलेले आढळले. एकनाथांच्या मते व्याख्याता कसा असावा,

` जो शब्दज्ञाने पारंगतु । ब्रह्मानंदे सदा डुल्लतु ।
शिष्यप्रबोधनी समर्थु । यथोचितु निजभावे ।।[१]

असे त्यांच्याच भाषेमध्ये मांडलेले आढळले.

अभ्यासकाने, मराठी भाषेवरील प्रेम व मराठी भाषेचा स्वाभिमान, ` संस्कृत ग्रंथकर्ते ते महाकवी । मा प्राकृती काय उणिवी । ` एकनाथांच्या शब्दात व्यक्त केल्याचे दिसले.

विशिष्ट कालखंडातील साहित्याचा वाङ्.मयीन अभ्यास साहित्यिकांच्या साहित्यकृतींचा वाङ्.मयीन अभ्यास, प्रादेशिक साहित्यकृतींचा वाङ्.मयीन अभ्यास, विशिष्ट वाङ्.मयाचा अभ्यास या स्वरूपाचे सोळा प्रबंध असल्याचे दिसून आले. ` महात्मा फुले - समाजचिंतन व वाङ्.मयीन कार्य ` या प्रबंधामध्ये महात्मा फुले यांचा शिक्षण घेण्याबद्दलचा जिव्हाळा,

` आता तरी तुम्ही घेऊ नका मागे,<br>
धिक्कारानी टाका मनुमन<br>
विद्या शिकताच पावाल ते सुख<br>
घ्यावा माझा लेख जोति म्हणे `[२]

व्यक्त झालेला दिसला.

3604
A

निबंधाची व्याख्या देऊन महात्मा फुले यांचे गुलामगिरी, शेतक-यांचाआसूड, इशारा हे निबंध वर्णिलेले आढळले.

लेखक लिखाणात आपला आशय व्यक्त करतो. ते लिखाण वाचले म्हणजे वाचकांच्या मनातला आशय यांची एकवाक्यता ज्या लिखाणातून होईल ते कालदृष्ट्या यशस्वी लिखाण. असे लिखाण म्हणजे ललित वाङ्मय. याप्रमाणे ललित वाङ्मयाची व्याख्या केल्याची दिसली.

` महानुभाव पंचकृष्ण ` या प्रबंधामध्ये, यादवकालीन मराठी भाषेच्या वाङ्मयाचा नमुना म्हणून महानुभाव वाङ्मय उपयुक्त असले तरी एका प्रखर व्यक्तिनिष्ठेने भारावलेल्या पंथीयांनी जोपासलेले हे वाङ्मयधन भाषाशास्त्रीयदृष्ट्याही अत्यंत महत्वाचा पुरावा म्हणून उपयुक्त ठरले[3] हे दिसून आले.

` मराठी ललित साहित्यातील निसर्ग ` या प्रबंधामध्ये ` आधी भाषा निर्माण होते आणि नंतर तिच्यावरून त्या भाषेचे व्याकरणशास्त्र जन्माला येते. भाषा आणि व्याकरणशास्त्र यांच्या पूर्वापर संबंधाप्रमाणेच साहित्य आणि साहित्यशास्त्र यांचा पूर्वापर संबंध आहे. `[4] असे आढळले.

साहित्यिकांच्या साहित्यकृतींचा चिकित्सक अभ्यास या स्वरूपाचे सहा प्रबंध असल्याचे आढळून आले. ` श्री.ना. पेंडसे यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास ` या प्रबंधामध्ये पेंडसेपूर्व कादंबरी, लेखन चर्चा, श्री.ना. पेंडसे यांच्या कादंब-या आणि त्यातील यश, श्री.ना. पेंडसे यांचे नाट्यलेखन, श्री.ना.पेंडसे याना प्रादेशिक कादंबरीकार म्हणावे की काय ? त्यांचे आत्मचरित्र लेखन, प्रवास वर्णन व समीक्षालेखन इत्यादी विषयक ऊहापोह केलेला दिसला.

साहित्याचा तुलनात्मक अभ्यास या स्वरूपाचे दोन प्रबंध असल्याचे दिसून आले. त्यामध्ये शेक्सपीअरचा मराठी नाटकावर झालेला परिणाम व ` मराठीतील रामायणे व प्राकृतातील रामायणे यांचा तुलनात्मक अभ्यास ` हे आढळून आले.

शिक्षणशास्त्र या विषयामध्ये राज्यातील चार विद्यापीठात मराठी विषयानुषंगाने पी.एच्डी. पदवीसाठी दाखल झालेले एकूण १० प्रबंध असल्याचे दिसून आले.[१] त्यामध्ये इयत्ता दुसरी व तिसरीच्या विद्यार्थ्यांचा मूलभूत शब्दसंग्रह ( Basic Vocabulary ), इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांचा मूलभूत शब्दसंग्रह, इयत्ता ५ वीच्या विद्यार्थ्यांचा मूलभूत शब्दसंग्रह आणि इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांचा मूलभूत शब्दसंग्रह हे चार प्रबंध पुणे विद्यापीठातील असल्याचे आढळून आले.

` नऊ ते तेरा वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांच्या मराठीतील बुध्दिमत्ता कसोट्या ` व ` बारा ते अठरा वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांच्यासाठी प्रमाणित बौध्दिक शब्दचाचणी ` हे दोन प्रबंध अनुक्रमे मुंबई विद्यापीठातील व मराठवाडा विद्यापीठातील दिसून आले.

` माध्यमिक शाळा स्तरामधील मराठी भाषा बोलणाऱ्या मुला-मुलींची वाचन अभिरुची ` व ` महाविद्यालयीन शिक्षणस्तरामधील विद्यार्थ्यांच्या वाचन आवडी व रुची ` हे दोन प्रबंध अनुक्रमे मुंबई विद्यापीठातील व नागपूर विद्यापीठातील दिसून आले.

` संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व रामदास यांच्या वाङ्मयातून अनौपचारीक शिक्षण ` व ` बृहन् मुंबईतील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे मराठीतील निबंध ( Composition ) लेखन ` हे दोन प्रबंध अनुक्रमे नागपूर विद्यापीठ व मुंबई विद्यापीठातील दिसून आले.

शिक्षणशास्त्र या विषयामध्ये राज्यातील तीन विद्यापीठात मराठी अध्ययन-अध्यापनानुषंगाने वीस प्रबंध एम्.एड्. पदवीसाठी दाखल झालेले आढळून आले. त्यामध्ये ` वाचन अभिरुची ` च्या स्वरूपाचे एकूण तीन प्रबंध दिसून आले. त्यापैकी ` प्राथमिक शाळेतील वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांची

मराठी भाषेतील वाचन अभिरुची,' ' माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची वाचन अभिरुची ' हे दोन प्रबंध मुंबई विद्यापीठातील व ' माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांची वाचन अभिरुची ' हा प्रबंध नागपूर विद्यापीठातील आढळून आले.

' निबंध ( Composition ) लेखन अध्यापन ' या स्वरूपाचे तीन प्रबंध दिसून आले. ' माध्यमिक शिक्षणामध्ये निबंध लेखन अध्यापन संदर्भात मातृभाषेचे स्थान,' ' प्राथमिक शाळेतील वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांना मातृभाषेतून निबंध अध्यापन ' व ' इयत्ता ८ वी, ९ वी मराठी व इंग्रजीमध्ये निबंध लेखन तुलनात्मक अभ्यास ' हे तीनही प्रबंध मुंबई विद्यापीठातील आहेत असे आढळून आले.

' मराठी लेखन, भाषण यातील चुकांचा अभ्यास व त्यावरील उपाय ' या स्वरूपाचे तीन प्रबंध दिसून आले. त्यापैकी, ' इयत्ता ८ वीच्या मराठी लेखन व भाषणातील सर्वसाधारण चुकांचा अभ्यास व त्यावर उपाय,' ' मातृभाषेतील (मराठी) सर्वसाधारण चुकांचा अभ्यास व त्यावर उपाय ' हे दोन प्रबंध मुंबई विद्यापीठातील व ' इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांच्या मराठीतील सर्वसाधारण चुका ' हा प्रबंध नागपूर विद्यापीठातील असल्याचे आढळले.

' अध्यापन पध्दती ' वर सहा प्रबंध पहाण्यात आले. त्यापैकी, ' माध्यमिक शाळेतील मराठी विषयाची नवीन अध्यापनपध्दती व परंपरागत अध्यापन पध्दती यांचा तुलनात्मक अभ्यास,' ' इयत्ता ९ वी मधील मराठी पद्य अध्यापनाचे स्वरूप,' ' इयत्ता ५ वीच्या मराठी अध्यापनातील अडचणींचा अभ्यास,' हे तीन प्रबंध मुंबई विद्यापीठातील व ' प्राथमिक शाळेतील मराठी अध्यापनाचे मूल्यमापन,' ' माध्यमिक शाळातील मराठीचे उद्दिष्टानुरूप अध्यापन ' व ' प्राथमिक शाळेतील मराठीचे अध्यापन ' हे तीन प्रबंध नागपूर विद्यापीठातील असल्याचे आढळून आले.

` पाच वर्षे वयाच्या मुलांचा भाषण शब्दसंग्रह ` व ` सहा वर्षे वयाच्या मुलांचा शब्दसंग्रह ` असे हे दोन प्रबंध नागपूर विद्यापीठातील दिसून आले.

` माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्यासाठी मराठीतील सामुहिक कसोटी,` ` विद्यार्थ्यांचे साहित्य ( Literature ) एक अभ्यास ` हे दोन प्रबंध मुंबई विद्यापीठातील व ` इयत्ता ४ थी व इयत्ता ६ वीच्या पाठ्यपुस्तकांचा समीक्षणात्मक अभ्यास ` प्रबंध नागपूर विद्यापीठातील आढळून आले.

शिक्षणशास्त्र विषयामध्ये मराठी अध्ययन-अध्यापनाच्या अनुषंगाने पी.एच्.डी. पदवीसाठी व एम्.एड्. पदवीसाठी दाखल झालेल्या प्रबंधाचे विषय व आशय यामध्ये बरीच विविधता आढळून आली. बऱ्हंशी प्रबंध हे ` शब्दसंग्रह,` ` मराठी अध्यापन पध्दती, ` ` मराठी लेखन-भाषण यातील सर्वसाधारण चुकांचा अभ्यास व त्यावरील उपाय,` ` वाक्य अभिरुची,` ` निबंध ( Composition ) लेखन अध्यापन ` या विषयावरीलच असल्याचे आढळले.

मराठी भाषा विषयाचे अध्ययन-अध्यापन प्रभावी होण्यासाठी मराठीच्या अध्यापकाला आवश्यक असलेले गुण कोणते ? कोणत्याप्रकारची भाषाकौशल्ये किती प्रमाणात आवश्यक आहेत ? या विषयीची प्रमाणके तयार करुन प्रमाणित कसोट्या तयार कराव्यात. या सारख्या संशोधन विषयावर संशोधन झालेले नाही. ` मराठी विषय शिकविणारा अध्यापक व त्यास आवश्यक ते गुण व भाषा-कौशल्ये ` हा विषय संशोधनाच्या दृष्टीने दुर्लक्षित झालेला आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही असे वाटते.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तकनिर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळ दशवार्षिक अहवालातील निष्कर्ष पुढीलप्रमाणे -

* इयत्ता दहावीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींचा मराठी हा सर्वात आवडता विषय असून सर्वात नावडता विषय पदार्थविज्ञान असल्याचे पहाणीत आढळून आले. शालेय विषयाकडे विद्यार्थ्यांचा पहाण्याचा दृष्टीकोन कसा असतो या संदर्भातही एक पहाणी करण्यात आली होती. या नमुना पहाणी-साठी राज्यातील एकूण सत्तर शाळा निवडण्यात आल्या होत्या. या पहाणीसाठी शहर आणि ग्रामीण भागातील सुमारे दहा हजार विद्यार्थी विद्यार्थिनींची मते अजमावण्यात आली. इंग्रजी हा सर्वात अवघड विषय असून सर्वात सोपा विषय मराठी असल्याचे या दहावीच्या विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.[**६]

महाराज सयाजीराव विद्यापीठ, बडोदा येथील शिक्षणशास्त्र आणि मानसशास्त्र विभागामार्फत बी.एड्.च्या विद्यार्थ्यांनी सन १९७६-७७, १९७७-७८ व १९७८-७९ या वर्षांमध्ये लघुकालीन प्रकल्प घेतला.

प्रकल्पाचे नाव : " Developing Creativity through Creative activity. "

| Area | Activity |
|---|---|
| 1) Teaching Prose and Poetry (Textual) through (listening, speaking, reading). B.Ed. Trainees 1976-77 | - Observing Short Plays and acting.<br>- Role playing and dramatization.<br>- Listening to taped sounds with.<br>- Specially prepared viewing material and to react.<br>- Helping pupils draw sketches of the things or incidents described. |

| | |
|---|---|
| 2) Poetry, Composition, Grammar, free expression (speaking, reading, writting) B.Ed. trainees 1978-79 | - Learning from the taped material and responding.<br>- Guiding, thinking, imagining concept farming and interpreting.<br>- Voicing their feelings in speech and writting.<br>- Responding to the tunes listened to with speech modulation, facial expressions and correct actions.<br>- Preparing class-magazine, collecting bulletin-board, pictures, displaying their writting or sketches and pictures - singing individually and in chorus.<br>- Composing short conversations dialogues. |
| 3) Prose, Poetry, Grammar, Composition (comprehension and expression) (speaking, reading, writting) B.Ed. trainees 1978-79 | - Anecdotes used for story-telling and re-telling<br>- Pictures for reading (comprehension and expression)<br>- Preparation of sketches, objects and models of daily use and interest of vocabulary enrichment.<br>- Pictures (large sized) and charts for initiating pupils in the art of expressing ideas freely.<br>- Using tape recorder for checking correct pronunciation and interaction.<br>- Written experience in prose.<br>- Collecting photographs, information and details about things, objects, persons etc. |

संशोधनपर संदर्भांचा गोषवारा :

मराठी भाषेच्या अध्यापकांचे मराठी भाषेवर प्रभुत्व पाहिजे. विद्यार्थ्यांना बोधामृत देताना मराठी अध्यापकाचे भाषेवरील प्रेम व्यक्त झाले पाहिजे. मराठी विषयाच्या अध्यापकाजवळ आवश्यक असणाऱ्या ह्या गुणांना ` एकनाथी भागवत ` या प्रबंधामध्ये आधार मिळाला.

` महात्मा फुले - समाजचिंतन व वाङ्मयीन कार्य ` या प्रबंधामध्ये अभ्यासकाने महात्मा फुले यांचा शिक्षणाबद्दल आग्रह आणि जिव्हाळा व्यक्त केला. अशाप्रकारचा विद्यार्थ्यांविषयी अंत:करणापासूनचा जिव्हाळा अध्यापकांच्या अंगी असला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या अध्ययनाबद्दल अध्यापकांनी आग्रह धरला पाहिजे. संशोधनाच्यादृष्टीने हा भाग उपयुक्त वाटला.

ललित वाङ्मय, निबंध या लेखनप्रकारांचा अध्यापकाना परिचय पाहिजे. मराठी विषयाच्या अध्यापकास मराठी भाषेचा विकास कसा होत गेला याची माहिती हवी. यासाठी यादवकालीन मराठी वाङ्मयाचा अभ्यास करताना महानुभाव वाङ्मय अध्यापकाना नजरेआड करून कसे चालेल ? अध्यापकाच्या वाङ्मय संस्कारक्षम मनाची जडणघडण झाली पाहिजे. म्हणून कादंबऱ्या, कथा, नाटके, आत्मचरित्रे, प्रवासवर्णन, समीक्षण, निबंध, लघुनिबंध इत्यादी वाङ्मय अध्यापकाने वाचायला हवे.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि संशोधन मंडळामार्फत करण्यात आलेल्या पहाणीमध्ये मराठी हा विषय सोपा असल्याचे आढळून आले. भाषा आणि भाषाशास्त्र यांच्यातील संबंध अध्यापकांना माहिती हवा.

नाट्यीकरण, मार्गदर्शन, भाषण व लेखनातील भावना, श्रवण केलेल्या आवाजाप्रमाणे अचूक कृती, चेहऱ्यावरील हावभाव, हस्तलिखीते तयार करणे, फलकासाठी चित्रे गोळा करणे, संक्षिप्त संवादांची रचना करणे,

कथा-कथन, शब्दसंग्रहाची आवड व वापर वाढविण्याच्यादृष्टीने आराखडे, वस्तू प्रतिकृती तयार करणे व वापरणे. चित्रे, तक्ते तयार करणे व वापरणे, अचूक उच्चारासाठी टेपरेकॉर्डरचा उपयोग करणे, छायाचित्र संकलन करणे, वस्तू किंवा व्यक्ति यांची माहिती संकलन करणे इत्यादी बाबींना अध्ययन-अध्यापनामध्ये अत्यंत महत्वपूर्ण स्थान पाहिजे.

मूलभूत शब्दसंग्रह ( Basic Vocabulary ) विद्यार्थ्यांच्या वाचन आवडी व संबंधी, बुध्दिमत्ता कसोट्या व बौध्दिक शब्द बाबणी या निर्देशिलेल्या प्रबंधामध्ये विषयानुषंगाने विविधता आढळली तथापि ' मराठी अध्यापकास आवश्यक ते गुण व भाषाकौशल्ये यांची प्रमाणके तयार करणे ' हा प्रस्तुत संशोधनाचा विषय नवीन असल्यामुळे संबंधित असे अधिक संशोधन संदर्भ उपलब्ध झालेले नाहीत.

## टीपा - संदर्भसूची


१. कुलकर्णी डी.व्ही., " एकनाथी भागवत," - प्रबंध.

२. आपटे सुधा, " महात्मा फुले - समाजचिंतन व वाङ्मयीन कार्य, " प्रबंध, पृ. २२.

३. कुंदप के.बी., " महानुभाव पंचकृष्ण," प्रबंध, पृ. ३७९.

४. कुलकर्णी व्ही.एन., " मराठी ललित साहित्यातील निसर्ग," प्रबंध, पृ. १२२.

५. "Platinum Jubilee" 1906 to 1981, Educational Research in Universities in Maharashtra, Edited by N.K.Patole, March, 1982.

६. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळाचा १९६८-७७ चा दशवार्षिक अहवाल - निष्कर्ष.

७. "Quest in Education" - January, 1981, Indian Council of Basic Education, Gandhi Shikshan Bhavan, Bombay, Chapter - 'Creativity in Language Teaching' by Dr. Siddhia T. Mehta, p. 22.